दैनिक
सह्याद्रीचा राखणदार

# नूतन विद्यालयात सायबर सुरक्षा विषयक मार्गदर्शन



**धुळे । प्रतिनिधी**

नूतन माध्यमिक विद्यालयात सायबर सुरक्षा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. क्विक हील फाउंडेशन पुणे येथील कैलास काटकर यांच्या मार्फत सायबर वॉरियर्सची नियुक्ती करण्यात आली आहे. धुळे येथील एस.एस.व्ही.पी.एस. कॉलेजच्या बी.एस.सी. कंप्यूटर शिक्षण घेत असलेल्या रुपाली संजय माळी आणि अंकिता विजय महाजन या विद्यार्थिनींना सायबर वॉरियर्स म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

या सायबर वॉरियर्सच्या माध्यमातून जिल्ह्यातील दहा शाळांमध्ये सायबर सुरक्षा याविषयी जनजागृती केली जात आहे. नूतन माध्यमिक विद्यालयात रुपाली संजय माळी यांनी नेटवर्क सुरक्षा आणि मोबाईल सुरक्षा याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अंकिता विजय महाजन यांनी मोबाईल फोन, सोशल नेटवर्किंग वेबसाईट्स वापरातील समस्या व उपाययोजना, मोबाईल ॲप्लिकेशन्स, पासवर्ड सुरक्षा आणि सोशल मीडिया सायबर गुन्हे याविषयी माहिती दिली. शाळेचे मुख्याध्यापक डी.पी. माळी यांनी खाजगी माहितीचा आणि छायाचित्रांचा गैरवापर करून पैसे उकळण्याच्या पद्धतीसंबंधी माहिती दिली. तसेच, शिक्षकांनी एस.पी.एंडाईट आय सुरक्षा विषयी माहिती प्रदान केली.

या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक डी.पी. माळी, शिक्षक, एस.पी.एंडाईटचे ए.डी. पाटील, बी.ए. माळी, एस.सी. महाजन, व्ही.डी. शिरसाठ, के.एल. ठाकरे, पी.सी. धनगर, जी.वाय. जगताप, व्ही.आर. माळी, डी.डी. सोनवणे, कुवर सर इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.